महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-१२२३/प्र.क्र.१५/सीईटी/२०२४/१०१२ दिनांक - १९/०६/२०२४.

# जाहीर सूचना
## एमएचटी-सीईटी २०२४
## सामाईक प्रवेश परीक्षा निकालाबाबत

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र आणि कृषी शिक्षण या पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता सामाईक प्रवेश परीक्षा एमएचटी-सीईटी २०२४ ऑनलाईन प्रवेश परीक्षा घेण्यात आलेली असून त्याचा निकाल दिनांक १६ जून, २०२४ रोजी सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

सदर परीक्षेचा निकाल पर्सेंटाईल पध्दतीने लावण्यात आलेला असून संबंधीत पर्सेंटाईल काढण्याची पध्दतीबाबत दिनांक १७ एप्रिल, २०२४ रोजी परिपत्रक उमेदवार/ पालक/ संस्था यांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

तसेच उमेदवारांच्या लॉगीनमध्ये उमेदवारास देण्यात आलेली संबंधीत सामाईक प्रवेश परीक्षेची प्रश्नपत्रिका, उमेदवारांनी दिलेले उत्तर व अचूक उत्तर उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. तसेच उमेदवारांकडून प्रश्न व उत्तरांबाबत काही आक्षेप असल्यास ऑनलाईन पध्दतीने आक्षेप नोंदणी करुन घेण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने सदरील अक्षेपांचे निराकरण करुन दिनांक ०७ जून, २०२४ रोजी जाहिर सूचना प्रसिध्द केली आहे.

सदरील प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर पर्सेंटाईल पध्दतीने तयार झालेला निकाल विशेष तज्ज्ञांकडून पडताळणी करुन लावण्यात आलेला आहे. संबंधीत उमेदवारांकडून प्राप्त विनंती अर्जांचे शंका निराकरण राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत करण्यात येत आहे.

याबाबत उमेदवार/ पालक/ संस्था यांनी निकालाबाबत कोणतेही साशंकता बाळगू नये.

**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**